(195)

क्र. प्राधिकरण/१२/५८०७/७७

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
नवीन प्रशासन भवन, १८ वा मजला,
मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर,
मुंबई नं. ४०० ०२१.

दिनांक : ११ ऑक्टोबर, १९७७.

प्राधिकरणाच्या दिनांक १३ सप्टेंबर, १९७७ रोजी भरलेल्या बाराव्या सभेच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत जोडली आहे.

(कार्यवृत्ताची इंग्रजी प्रत या अगोदरच्या दिनांक २३ सप्टेंबर, १९७७ च्या परिपत्रकाव्दारे पाठविण्यात आली आहे).

कार्यासन अधिकारी

प्रति,

सर्व सदस्य व निमंत्रित. (M.C. BMRDA)

प्राधिकरणाचे सर्व अधिकारी.

Scy/E.C. S.O.(W.)

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या

## दिनांक १३ सप्टेंबर, १९७७ रोजी भरलेल्या बाराव्या बैठकीचे कार्यवृत्त

स्थळ : मुंबई महानगर पालिकेचे सभागृह

------

बैठकीस उपस्थित असलेल्या सदस्यांची व निमंत्रीतांची यादी प्रपत्र 'अ' म्हणून जोडली आहे.

२. अध्यक्षांनी प्रथम विधानसभेचे सदस्य सर्वश्री ए. टी. पाटील व प्रमोद नवलकर, विधान परिषदेचे सदस्य श्री. द.ब. उर्फ तात्या सुळे आणि मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री पी. आर्. पुसाळकर यांचे प्राधिकरणाचे सदस्य म्हणून नेमणूक झाल्याबद्दल स्वागत केले.

३. त्यानंतर कार्यक्रम पत्रिकेवरील बाबी विचारात घेण्यात आल्या.

<u>बाब क्र. १</u> : <u>मागील (अकराव्या) बैठकीच्या कार्यवृत्तास पुष्टी देणे</u>

खालील दोन बदल विचारात घेऊन कार्यवृत्तास पुष्टी देण्यात आली.

(अ) प्राधिकरणाच्या पृष्टांकन क्रमांक बीएमआरडीए/११/३४९२/७७ मध्ये नमुद केलेल्या ठराव ११६ ते १२४ यांना १२० ते १२८ म्हणून नवीन क्रमांक देण्यात यावेत.

(ब) नविन ठराव क्रमांक १२३ (पूर्वीचा ठराव क्रमांक ११९) च्या दुसऱ्या परिच्छेदाशे शेवटी खालील वाक्ये जोडण्यात यावीत :-

" निवास क्षेत्रातील भाडेपट्टीच्या हप्त्याचा दर ठरविताना, स्थायी समितीने त्याच संस्थेस कार्यालये उभारण्यासाठी कोणत्या प्रमाणात जागा देण्यात आली आहे व त्या जागेची भाडेपट्टी किती आकारण्यात आली आहे याकडे योग्य ते लक्ष पुरवावे. हिंदूस्थान पेट्रोलियम निगम मर्यादित या संस्थेस देण्यात आलेली व वर नमुद केलेली जमिन सरसकट देवघेव म्हणून मानण्यात यावी".

<u>बाब क्र. २</u> : <u>मागील (अकराव्या) बैठकीच्या कार्यवृत्तावर करण्यात आलेली कार्यवाही</u>

<u>ठराव १२९</u> : केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

<u>बाब क्र. ३</u> : <u>नवी मुंबईच्या विकास योजनेचा मसुदा</u>

कांही सदस्यांनी सदर मसुद्यावर विचार करण्यासाठी जास्त वेळेची गरज असल्याचे सांगून ही बाब पुढे ढकलण्यात यावी असे सुचविले. महानगर आयुक्तांनी असे निदर्शनास आणून दिले की, ही बाब जून १९७६ पासून प्राधिकरणाच्या विचाराधिन आहे व त्यावरील करावयाचा विचार अधिक पुढे ढकलणे इष्ट होणार नाही. थोड्याशा चर्चेनंतर अध्यक्षांनी ही बाब पुढे ढकलण्यास मान्यता दिली. परंतु ही अखेरचीच तहकुबी म्हणून मानण्यात यावी असा अभिप्राय व्यक्त केला. त्यांनी अशीही विनंती केली की सभासदांच्या जर कांही सुचना असतील अगर जे कांही म्हणणे असेल ते त्यांनी ३० सप्टेंबर १९७७ च्या पूर्वी सादर करावे. त्यानंतर असेही ठरविण्यात आले की, या विषयावरील प्राधिकरणाचे अभिप्राय निश्चित करण्यासा व ते शासनास कळविण्याच्या दृष्टीने ऑक्टोबर १९७७ मध्ये प्राधिकरणाची एक खास बैठक बोलाविण्यात यावी.

बाब क्र. ४......

बाब क्र. ४ : नागरी कला मंडळ स्थापन करणे

या विषयावरील चर्चेच्या वेळी काही सभासदांनी अशी इच्छा व्यक्त केली की, या बाबीत उल्लेखिलेल्या नागरी कला आयोगाचे कार्य आणि त्याच्या संभाव्य प्रादेशिक मर्यादा याबद्दल अधिक माहिती पुरविण्यात यावी. त्यानंतर असे ठरविण्यात आले की, सदर मुद्याचे स्पष्टीकरण करणारी एक टिप्पणी प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत विचारविनिमयासाठी सादर करण्यात यावी.

बाब क्र. ५ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम ३५(२) व ४२(२) मधिल प्राधिकरणाचे अधिकार स्थायी समितीस प्रदान करण्याबद्दल

सदर विषयावरील कार्यक्रम पत्रिकेतील टिप्पणी प्राधिकरणाने विचारात घेऊन पुढील ठराव मंजूर केला.

ठराव १३० : असा ठराव करण्यात येतो की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ६(२)(ब) अन्वये प्राप्त होणा-या अधिकारानुसार, कलम ३५(२) व कलम ४२(२) यानुसार निश्चित करावयाचे अधिनियमाखाली संपादिलेल्या जमिनीची रक्कम राज्य शासन व संबंधित व्यक्ती यांच्या परस्पर संमतीने जी ठरेल तीला संमत्ती देण्याचे आपले अधिकार प्राधिकरण स्थायी समितीस प्रदान करीत आहे.

बाब क्र. ६ : क्षेत्र विकास योजनेकरीता मुंबई उपनगर जिल्ह्यातील कांदिवली, चारकोप आणि शिंपोली या गावांतील शासकीय जागा ताब्यात घेणे

कार्यक्रम पत्रिकेवरील टिप्पणी विचारात घेऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला.

ठराव १३१ : ठराव करण्यात येतो की :-

(अ) कार्यक्रम पत्रिकेवरील टिप्पणीच्या परिच्छेद २ मध्ये नमूद केलेल्या शासकीय जमिनी प्राधिकरणास हस्तांतरीत करण्यास शासनास केलेल्या विनंती संबंधीच्या महानगर आयुक्तांच्या कार्यवाहीस घटनोत्तर मान्यता देण्यात आली.

(ब) संबंधित शासकीय जमिन बाजार भावाने घेण्यात यावी व तत्संबंधीच्या अटी व शर्ती शासन ठरविल त्याप्रमाणे असाव्यात.

(क) गृहनिर्माण, नागरी नवीनिकरण व पर्यावरण मंडळाच्या १९७७-७८ च्या वार्षिक कार्यक्रमात मुंबई उपनगर जिल्ह्यातील जोगेश्वरी येथील क्षेत्र विकास योजनेऐवजी मुंबई उपनगर जिल्ह्यातील कांदिवली येथील जमिन उपलब्ध झाल्यास 20 हेक्टर मर्यादेपर्यंत क्षेत्र विकास योजना समाविष्ट करण्यात यावी.

(ड) गृहनिर्माण, नागरी नविनीकरण व पर्यावरण मंडळाने तयार करावयाच्या सविस्तर क्षेत्र विकास योजनेस मंजूरी देण्याचे अधिकार या ठरावाद्वारे स्थायी समितीस देण्यात येत आहेत.

बाब क्र. ७ : श्री. सुधीर जोशी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे सदस्य, यांजकडून आलेल्या सूचना

केंद्रिय रस्ते संशोधन संस्थेकडून अहवाल व शिफारशी प्राप्त झाल्यावर ही बाब विचारात घेण्यात यावी असे संमत करण्यात आले.

बाब क्र. ८ ......

बाब क्र. ८ : १९७६-७७ चा प्राधिकरणाचा ताळेबंद आणि अर्थ सल्लागारांचा त्यावरील अहवाल

प्राधिकरणाने ताळेबंदाची नोंद घेतली.

बाब क्र. ९ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सेवेच्या अटी) नियम, १९७७ मध्ये सुधारणा

प्राधिकरणाने कार्यक्रम पत्रिकेवरील टिप्पणी विचारात घेतली व पुढील ठराव संमत केला.

ठराव १३२ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सेवेच्या अटी)(दुरुस्ती) नियम, १९७७ चा मसुदा (प्रपत्र 'ब'), स्थायी समितीने आपल्या दिनांक ९ ऑगस्ट, १९७७ रोजी झालेल्या ९व्या बैठकीत ठराव क्रमांक ५८ नुसार तयार करुन शिफारस केल्याप्रमाणे, संमत करण्यात आला. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ५० खाली हे नियम करण्यात आले आहेत, असे समजण्यात यावें.

बाब क्र.१० : मुंबई महानगर प्रदेशातील पाणी पुरवठा, कचरा व मल निस्सारण योजनांसाठी आंतरराष्ट्रीय विकास संस्थेतर्फे अर्थसहाय्य

चर्चेच्या वेळी महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, जागतीक बँकेच्या प्रतिनिधींनी दिलेल्या सल्यावरुन सल्लागारांना जे काम द्यावयाचे आहे त्यांत मुंबई महानगर प्रदेशातील सर्व क्षेत्रासाठी जल संशोधन अभ्यासाचा समावेश करण्याचे आतां ठरले आहे. यामुळे सल्लागारांना द्यावयाच्या रकमेत रु. ४.१३ लाख पर्यंत वाढ होणार आहे.

ठाणे जिल्ह्यातील काही सदस्यांनी असे निदर्शनास आणले की, ठाणे जिल्हा नियोजन विकास परिषदेकडे अत्यंत मर्यादित निधी उपलब्ध असल्याने मुंबई महानगर पालिकेच्या बाहेरी क्षेत्रातील प्रकल्पांना अर्थसहाय्य करण्यासाठी कार्यक्रम पत्रिकेवरील टिप्पणीमध्ये निर्दिष्ट केलेला नमुना जर अंगीकारावयाचा असेल तर जिल्हा नियोजन विकास परिषद या प्रकल्पांसाठी जो निधी उपलब्ध करुन देऊ शकेल, त्याशिवाय आणखी राज्य शासनाकडून भरीव सहकार्याची आवश्यकता आहे. अध्यक्षांनी या परिस्थितीची दखल घेतली आणि सांगितले की, योग्य वेळी ही बाब विचारात घेण्यात यावी अशी विनंती राज्य शासनाला करण्यात यावी.

श्री. ऐ.टी. पाटील आणि डॉ. ऐम्.जी. परुळेकर या सदस्यांनी असा आग्रह धरला की, सध्याच्या सुसाध्यता अहवालात ज्या क्षेत्राचा समावेश होत नाही अशांसाठी सुध्दा असा अहवाल तयार करण्यात यावा. महानगर आयुक्तांनी असे निदर्शनास आणले की, हाती घेण्यात येणा-या जल संशोधन अभ्यासात सर्व प्रदेशाचा समावेश असून या प्रदेशातील पाण्याच्या संपूर्ण आवश्यकतेच्या संदर्भांत पाणी पुरवठ्याचे मार्ग शोधून काढण्याच्या दृष्टीने त्याची मदत होणार आहे. विविध क्षेत्रासाठी अशा प्रकारचे प्रकल्प त्यानंतर स्वतंत्ररित्या अभ्यासण्यात येतील.

त्यानंतर प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला.

ठराव १३३ : असा ठराव करण्यात आला की, कार्यक्रम पत्रिकेमध्ये नमुद केलेली आंतरराष्ट्रीय विकास संघटनेकडून पाणीपुरवठा, गटारे, कचरा आणि मलनि:सारण योजनांचा सुसाध्यता अहवाल तयार करण्याच्या दृष्टीने महानगर आयुक्तांनी सुरु केलेल्या कार्यवाहीची प्राधिकरणाने नोंद घेतली आणि मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने तयार करावयाच्या अहवालासाठी सल्लागार सेवेवर प्रथमत: रु. ४.१३ लाख पर्यंत रक्कम खर्च करण्याच्या प्रस्तावास मान्यता

देण्यात आली.....

देण्यात आली. हा खर्च नंतर प्रकल्पाच्या निरनिराळ्या घटकावर खर्ची टाकावयाचा आहे.

पुढे असेही ठरविण्यात आले की, जल संशोधन अभ्यास पूर्ण झाल्यावर आणि निधी उपलब्ध करण्याचे मार्ग निश्चित झाल्यानंतर महानगर प्रदेशातील उर्वरीत क्षेत्रासाठी सुसाध्यता अहवाल तयार करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी.

बाब क्र. ११ : मुंबई पोर्ट ट्रस्ट कडून वरली - कोळीवाडा क्षेत्राचे पुन:प्रापण

मुंबई पोर्ट ट्रस्ट आणि मुंबई महानगर पालिका यांजकडून नंतर गोळा केलेली माहिती सभेपुढे ठेवण्यात आली. पोर्ट ट्रस्टने काम अगोदरच थांबविले होते. नगरपालिका आयुक्तांचे म्हणणे असे पडले की, या कामासाठी मुंबई महानगर पालिकेच्या परवानगीची आवश्यकता आहे आणि मुंबई महानगर पालिका याबाबतीत बॉम्बे पोर्ट ट्रस्टशी पत्रव्यवहार करील.

बाब क्र. १२ : बांद्रा - कुर्ला संकुलात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यालयासाठी इमारत बांधणे

प्राधिकरणाने कार्यक्रम पत्रिकेवरील टिप्पणी विचारात घेऊन पुढील ठराव संमत केला.

ठराव १३४ : ठराव करण्यात येतो की,

(१) बांद्रा-कुर्ला संकुलात प्राधिकरणाची मुख्य कार्यालये तेथे सोईचे व्हावे म्हणून अंदाजे रु. ९७ लाख खर्चाची इमारत बांधण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. इमारतीतील काही जागा वाणिज्य व्यवसायासाठी भाड्याने देण्यात यावी.

(२) इमारतीच्या बांधकामासाठी अर्थसहाय्य मिळावे म्हणून हुडकोकडे (अथवा अन्य अर्थसहाय्य संस्थांकडे) संपर्क साधण्यास महानगर आयुक्तांस प्राधिकृत करण्यात यावे.

(३) कार्यक्रम पत्रिकेवरील टिप्पणीशी सुसंगत अशा आवश्यक त्या सुधारणांसह या ठरावाची अंमलबजावणी करण्याचे अधिकार आणि अंदाजित खर्चाच्या तपशीलास प्रशासकीय मान्यता देण्यास स्थायी समितीस अधिकार देण्यात आले.

(४) महानगर आयुक्तांनी निवडलेला पहिल्या १५ हेक्टर क्षेत्रातील भूखंड या कामासाठी निश्चित करण्यात यावा. कार्यक्रम पत्रिकेवरील टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, भविष्यकाळात इमारतीच्या विस्तारास वाव राहील अशा दृष्टीने भूखंडाची निवड करण्यात यावी.

पवार/-
८.१०.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक १३ सप्टेंबर, १९७७ रोजी

बैठकीस उपस्थित असलेल्या सदस्यांची सूची

श्री. रत्नाप्पा कुंभार ... अध्यक्ष
नगरविकास मंत्री

श्री. मुरली एस्. देवरा, मुंबईचे महापौर ... उपाध्यक्ष

श्री. व्ही. आर्. होसिंग, गृहनिर्माण व मुंबई महानगर ... सदस्य
प्रदेश विकास प्राधिकरण मंत्री

श्रीमती ताराबाई वर्तक, अध्यक्ष, जिल्हा परिषद, ठाणे "

श्री. एच्.एम्. वंगारे, अध्यक्ष, जिल्हा परिषद, कुलाबा "

श्री. डी.एस्.नलावडे, अध्यक्ष, स्थायी समिती, मुंबई महानगर पालिका "

श्रीमती आशालता तोरस्कर, अध्यक्ष, सुधार समिती,
मुंबई महानगर पालिका "

श्री. एम्. एम्. सावंत, अध्यक्ष, बी.इ.एस्.टी. समिति,
मुंबई महानगर पालिका "

श्री. हंसराज गुप्ता, महानगर पालिका सदस्य, मुंबई "

श्री. पुष्पकांत म्हात्रे, महानगर पालिका सदस्य, मुंबई "

श्री. हशु अडवाणी, महानगर पालिका सदस्य, मुंबई "

श्री. सुधीर जोशी, महानगर पालिका सदस्य, मुंबई "

श्री. एस्. जे. कोहली, महानगर पालिका सदस्य, मुंबई "

श्री. एम्. ए. बांडवाणी, महानगर पालिका सदस्य, मुंबई "

श्री. श्रीपाद वामन पटवारी, अध्यक्ष, डोंबिवली नगरपालिका "

डॉ. एम्. जी. पडळेकर, अध्यक्ष, वसई नगरपालिका "

श्री. व्ही. के. पाटील, अध्यक्ष, पंचायत समिती, भिवंडी "

श्री. डी.एन्.पाटील, अध्यक्ष, पंचायत समिती, पनवेल "

श्री. व्ही. के. टेंबे, विधानसभा सदस्य, मुंबई "

श्री. एस्.एस्. दिघे, विधानसभा सदस्य, मुंबई "

श्री. प्रमोद नवलकर, विधानसभा सदस्य, मुंबई "

श्री. नकुल पाटील, विधानसभा सदस्य, ठाणे जिल्हा "

श्री. ए.टी. पाटील, विधानसभा सदस्य, कुलाबा जिल्हा "

श्री. एस्.डी. बसवंत, विधानपरिषद सदस्य, शहापूर "

श्री. डी.बी. उर्फ तात्या सुळे, विधान परिषद सदस्य "

श्री. एस्.व्ही. भावे, महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव "

श्री. पी.आर्. पुसाळकर, महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे "

श्री. सी.एम्. कोरिया, अध्यक्ष, गृहनिर्माण, नागरी नवीनीकरण व
पर्यावरण मंडळ, "

श्री. बी.एन्. आडारकर, अध्यक्ष, वहातुक आणि दळणवळण मंडळ "

श्री. पी.व्ही. नायक, महानगर आयुक्त, बी.एम्.आर्.डी.ए. सदस्य-सचिव

निमंत्रित :

सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग

मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ.

प्रपत्र 'ब'

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सेवेच्या अटी) नियम, १९७७

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ११ चे उपकलम (२) आणि कलम ६ चे उपकलम (२)(ब) कलम ५० सह प्राप्त अधिकारान्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुढील नियम करीत आहे.

१. (१) या नियमांना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सेवेच्या अटी)(सुधारणा), नियम १९७७ असे संबोधण्यात यावे.

(२) ते तात्काळ अंमलात येतील.

२. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सेवेच्या अटी) नियम, १९७७ च्या नियम पांचमधील "स्थायी समितीने" हे शब्द, अंक व अक्षरानंतर पुढील तरतूद समाविष्ट करण्यात येईल :-

"अधिनियमाच्या कलम ७(२)(अ)(५) खालील नियम ६(२)(अ)(१०) अन्वये जागा मंजूर करण्याचे आपले अधिकार स्थायी समितीने जेथे जेथे प्रदान केले आहेत त्या जागांच्या वेतनश्रेण्या वेळोवेळी कार्यकारी समिती ठरविल त्या असाव्यात."

203

No. BMRDA/12/~~4979~~ 5607/77.

Bombay Metropolitan Region
Development Authority,
18th Floor, New Administrative
Building, Madame Cama Road,
Opp. Mantralaya, Bombay-400 021.

Date : 23rd September, 1977.

The minutes of the 12th meeting of the Bombay Metropolitan Region Development Authority held on the 13th September, 1977, are enclosed.

A Marathi translation will follow.

(P.R. Walawalkar),
Staff Officer.

To:

All Members & Permanent invitees.

All Officers of the BMRDA.

tms/23.9

(205)

TWELFTH MEETING OF THE BMRDA

Date: 13th September 1977

Place: Corporation Hall of the BMC.

The list of members and invitees present is attached (Annexure A).

2. The Chairman welcomed the new members, viz., Shri A.T. Patil, MLA, Shri Pramod Navalkar, MLA, Shri D.B. Sule, MLC, and Shri P.R. Pusalkar, General Manager of the Central Railway.

3. The items of the agenda were then taken up for consideration.

Item No. 1 : Confirmation of the minutes of the last (Eleventh) meeting.

The minutes were confirmed, subject to the following two changes :-

(a) The Resolution numbers 116 to 124 in the draft minutes circulated under endorsement No.BMRDA/11/3492/77, dated the 21st June, 1977, should be renumbered as 120 to 128.

(b) In the renumbered Resolution No.123 (Resolution No.119 in the circulated copy), the following sentences should be added at the end of the second paragraph :-

"In fixing the rate of lease premium for residential plots, the Standing Committee shall pay due regard to the extent of any plot allotted for office purposes to the same allottee and the rate at which the office plot is allotted. The above allotment of plots approved in favour of the Hindustan Petroleum Corporation Ltd. should be regarded as a package."

Item No. 2 : Action taken on the minutes of the last (Eleventh) meeting.

RESOLUTION 129 :- The action taken was noted.

Item No. 3 : Draft Development Plan for New Bombay.

Some members desired to have more time to consider the Draft Development Plan, and suggested the postponement

.....of the

of the item. The Metropolitan Commissioner pointed out that the item was pending with the Authority since June, 1976, and that it might not be desirable to delay its consideration any further. After some discussion, the Chairman agreed to postpone the item, but remarked that this would be the last postponement. He requested the members to send their suggestions and observations, if any, by the 30th September, 1977. It was also decided that a special meeting of the Authority be held in October, 1977 to finalize the Authority's views and to communicate them to Government.

Item No. 4 : Setting up an Urban Art Panel.

In the course of the discussion on this item, some members desired to have more information about the functions of an Urban Art Commission and its possible territorial jurisdiction in the present case. It was decided that a note covering these points should be put for consideration in the next meeting of the Authority

Item No. 5 : Delegation of the power of the Authority under Section 35(2) and 42(2) of the BMRDA Act, 1974, to the Standing Committee.

The Authority considered the Agenda Note, and passed the following resolution :-

RESOLUTION 130 :- "Resolved that, in exercise of the authority vested in it under clause (b) of Sub-Section (2) of Section 6, the Authority hereby delegates to the Standing Committee the Authority's power of giving its concurrence in the amount determinable under Sub-Section (2) of Section 35 and Sub-Section (2) of Section 42 of the BMRDA Act, 1974, by mutual agreement between the State Government and the person to whom the amount is payable for lands acquired under the BMRDA Act, 1974."

....Item 6.

(207)



Item No. 6 : Taking over Govt. land at villages Kandivali, Charkop and Shimpoli, District: BSD, for Area Development Scheme.

The Authority considered the Agenda Note, and passed the following resolution :-

RESOLUTION 131 : "Resolved that -

(a) the action taken by the Metropolitan Commissioner in requesting the State Govt. to transfer the Govt. lands, shown in para 2 of the agenda note, to the BMRDA be and is hereby approved post facto;

(b) the Govt. land in question may be taken over at market value and on such terms and conditions as Govt. may determine;

(c) an Area Development Scheme for an area, upto 20 Ha. at Kandivali, Dist. B.S.D., subject to availability of lands, be included in the Annual Works Programme of the HURE Board for 1977-78, in place of the Area Development Scheme at Jogeshwari, Dist. B.S.D.; and

(d) the Standing Committee be and is hereby authorised to accord approval to the details of the Area Development Scheme at Kandivali to be prepared by the HURE Board.

Item No. 7 : Suggestions received from Shri Sudhir Joshi, Member, BMRDA.

It was agreed that the matter might be considered further after the report and recommendations of the Central Road Research Institute were received.

Item No. 8 : Accounts of the Authority for the year 1976-77 and report of the Financial Adviser thereon.

The accounts were noted by the Authority.

Item No. 9 : BMRDA (Conditions of Service) Regulations, 1977 - Amendment of -

The Authority considered the Agenda Note, and passed the following resolution :-

RESOLUTION 132 : "Resolved that the draft Bombay Metropolitan

....Region

Region Development Authority (Conditions of Service) (Amendment) Regulations, 1977 (Annexure B), as prepared and recommended by the Standing Committee in its 9th meeting, held on the 9th August, 1977, by its Resolution No. 58 are approved. These regulations shall be deemed to have been made by the Authority under Section 50 of the BMRDA Act, 1974."

Item No. 10 : Water Supply, Sewage and Sullage Schemes in Bombay Metropolitan Region forAssistance under IDA-II.

In the course of the discussions, the Metropolitan Commissioner pointed out that, on the advice of the representative of the World Bank, it was now proposed to include a Water Resources Study for the entire area covered by the Bombay Metropolitan Region in the assignment proposed to be given to the consultants. As a result of this, the cost of the consultancy assignment was expected to go up to Rs.4.13 lakhs.

Some members from Thane District pointed out that the funds available at the disposal of the Thane D.P.D.C. being very limited, the financing of the project for the area outside BMC would require substantial support from the State Government in addition to the funds which the D.P.D.C. might be in a position to allocate to the project, if the pattern of financing mentioned in the agenda note was to be followed. The Chairman appreciated this position, and remarked that the State Government would be requested to consider this matter at the appropriate time.

Shri A.T. Patil and Dr. M.G. Parulekar, Members, urged that similar reports should be prepared for the areas in the Region not covered by the present Feasibility Report. The Metropolitan Commissioner pointed out that the Water Resources Study proposed to be undertaken would cover the whole of the Region, and would help to identify the sources of supply

....with

with reference to all the requirements in the Region. Such a study could then be followed up by individual projects for different areas.

The Authority thereafter passed the following resolution :-

RESOLUTION 133 : Resolved that the Authority has noted the action initiated by the Metropolitan Commissioner for the preparation of a Feasibility Report of the Water Supply, Sewerage, Sewage and Sullage Disposal Schemes in the Bombay Metropolitan Region, proposed to be posed for IDA assistance as indicated in the agenda note, and approves of the proposal to initially incur an expenditure to the tune of Rs.4.13 lakhs on consultancy services for the preparation of the Report by the BMRDA, the sa[illegible] being later debited to the different components of the Project.

Further resolved that action should be taken for preparing Feasibility Reports for the remaining areas in the Region after the completion of the Water Resources Study and on identifying the sources of funds.

Item No. 11 : Reclamation in Worli-Koliwada Area by the Bombay Port Trust.

The information gathered subsequently from the Port Trust and the Bombay Municipal Corporation was circulated in the meeting. The Port Trust had already suspended the work. The Municipal Commissioner felt that this work would require the permission of the Bombay Municipal Corporation, and that the Bombay Municipal Corporation would take up the matter with the Port Trust.

Item No. 12 : Construction of building for BMRDA offices in Bandra-Kurla Complex.

The Authority considered the Agenda Note, and passed the following resolution :-

....Res. 134.

RESOLUTION 134 : "Resolved that -

(i) the proposal to construct a building for accommodating the Authority's main offices in the Bandra-Kurla Complex, estimated to cost about Rs.97 lakhs, is approved. Some space in the building is to be rented for commercial purposes;

(ii) the Metropolitan Commissioner is authorised to approach HUDCO (or other financial institutions) for financing the construction of the building;

(iii) the Standing Committee is empowered to implement this dicision, with such modification as may be found necessary, consistent with the proposal in the agenda note, and to accord the administrative approval to the detailed estimated cost; and

(iv) a suitable plot, as may be selected by the Metropolitan Commissioner, in the first 15 Ha. area, should be earmarked for this purpose, the plot selected being such as/to provide for scope for expansion in future, as stated in the agenda note.

*****

tms/22.9

ANNEXURE 'A'.

List of Members Present at the Meeting of the Authority held on the 13th September, 1977.

| | |
|---|---|
| Shri Ratnappa Kumbhar, Minister (Urban Development). | Chairman |
| Shri Murli S. Deora, Mayonr of Bombay. | Vice-Chairman. |
| Shri V. R. Hoshing, Minister (Housing and BMRDA). | Member |
| Smt. Tarabai Vartak, President of Thana Zilla Parishad. | " |
| Shri H.M. Wangare, President of Kolaba Zilla Parishad. | " |
| Shri D.S. Nalavde, Chairman, Standing Committee, BMC. | " |
| Smt. Ashalata Toraskar, Chairman, Improvements Committee, B.M.C. | " |
| Shri M.M. Sawant, Chairman, BEST Committee, B.M.C. | " |
| Shri Hansraj Bhugra, Councillor, B.M.C., Bombay. | " |
| Shri Pushpakant Mhatre, Councillor, B.M.C., Bombay. | " |
| Shri Hashu Advani, Councillor, B.M.C., Bombay. | " |
| Shri Sudhir Joshi, Councillor, B.M.C., Bombay. | " |
| Shri S.J. Kohli, Councillor, B.M.C., Bombay. | " |
| Shri M.A. Khandwani, Councillor, B.M.C., Bombay. | " |
| Shri Shripad Waman Patwari, President, Municipal Council, Dombivli. | " |
| Dr. Madhukar Ganesh Parulekar, President, Municipal Council, Vasai. | " |
| Shri Vasant Kushaba Patil, Chairman, Panchayat Samiti, Bhivandi. | " |
| Shri Dattatraya Narayan Patil, Chairman, Panchayat Samiti, Panvel. | " |

Contd.....

| | |
|---|---|
| Shri V.K. Tembe, M.L.A.,<br>Bombay. | Member |
| Shri S.S. Dighe, M.L.A.,<br>Bombay. | " |
| Shri Promod Navalkar, M.L.A.,<br>Bombay. | " |
| Shri Nakul P. Patil, M.L.A.,<br>Thane District. | " |
| Shri A.T. Patil, M.L.A.<br>Kulaba District. | " |
| Shri S. D. Baswant, M.L.C. | " |
| Shri D.B. alias Tatya Sule, M.L.C. | " |
| Shri S.V. Bhave,<br>Chief Secretary,<br>Government of Maharashtra. | " |
| Shri P.R. Pusalkar,<br>General Manager,<br>Central Railway. | " |
| Shri C.M. Correa.<br>Chairman, Housing, Urban Renewal<br>and Ecology Board, BMRDA. | " |
| Shri B.N. Adarkar, Chairman,<br>Transport and Communications Board.<br>B.M.R.D.A. | " |
| Shri P.V. Nayak,<br>Metropolitan Commissioner,<br>B.M.R.D.A. | Member-Secretary. |

<u>INVITEES</u> :

Secretary to the Government of Maharashtra, Urban Development & Public Health Department.

Chief Executive Officer, Maharashtra Industrial Development Corporation (MIDC).

Vp:22.9.

ANNEXURE 'B'.

## THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY (Conditions of Service) Regulations, 1977.

In exercise of the powers conferred by Sub-Section (2) of Section 11 and Clause (b) of Sub-Section (2) of Section 6, read with Section 50 of the Bombay Metropolitan Region Development Authority Act, 1974, the Bombay Metropolitan Region Development Authority hereby makes the following Regulations, namely :-

1. (i) These Regulations may be called the Bombay Metropolitan Region Development Authority (Conditions of Service)(Amendment) Regulations, 1977.

   (ii) They shall come into force at once.

2. In the Bombay Metropolitan Region Development Authority (Conditions of Service) Regulations, 1977, in Regulation 5, after the words, figures and letters "by the Standing Committee", the following proviso shall be inserted :-

   "Provided that wherever the Standing Committee has delegated its power of creation of posts under the Authority under Sub-Clause (v) of clause (a) of Sub-Section (2) of Section 7 of the Act by virtue of Sub-Clause (x) of clause (a) of Sub-Section (2) of Section 6 of the Act, the pay-scales of such posts shall be such as may be specified from time to time by the Executive Committee".

tms/23.9